

# साहित्यसौंदर्य

93031


•संपादक•

प्रा.डॉ.सर्जेराव जिगे

• प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड
• प्रा.डॉ.उमेश मुंढे
• प्रा.डॉ.युवराज धबडगे
• प्रा.डॉ.सहदेव रसाळ

१.

# पुरी हौस फिटली

- ह. ना. आपटे

**परिचय -**

हरि नारायण आपटे (१८६४-१९१९)

मराठीतील आद्य व ज्येष्ठ कादंबरीकार म्हणून सुपरिचित. करमणूक हे साप्ताहिक चालविले. अकोला येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते संमेलनाध्यक्ष होते. त्यांनी अनेक पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत. 'आठ स्त्रीरत्ने' या सदराखाली ह. ना. आपटे यांनी भास्कराचार्यांची लीलावती, राणी दुर्गावती आदी स्त्रियांची बोधप्रद माहिती प्रकाशित केली होती. 'केशवसुतांची कविता' आणि गोविंद बल्लाळ देवल यांचे 'शारदा' हे नाटक हरिभाऊ आपट्यांनीच प्रकाशात आणले.

'उष:काल', 'सूर्योदय', 'गड आला; पण सिंह गेला', 'सूर्यग्रहण', 'चंद्रगुप्त', 'वज्राघात इ. ऐतिहासिक, तसेच' 'पण लक्षात कोण घेतो' यांसारख्या विपुल सामाजिक कादंबऱ्या लिहून त्यांनी मराठी कादंबरीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्यांची कादंबरी कादंबरी-वाङ्मयाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरावी इतकी श्रेष्ठ आहे.

उपदेशप्रधानता, प्रसंगनिष्ठता, सामाजिक वास्तवता व कल्पकता ही त्यांच्या कथेची वैशिष्ट्ये आहेत.

प्रस्तुत कथा त्यांच्या 'स्फुट गोष्टी'तून घेतलेली असून, त्यात हलाखीच्या परिस्थितीत कृत्रिम डामडौलाच्या मोहापायी एका मध्यमवर्गीय कुटुंबाला कराव्या लागणाऱ्या अनेक यातायातींचे वास्तव चित्र रेखाटले आहे.

**असे** महागाईचे दिवस, तीस रुपयांत दोघांचं पोट भरून शिल्ल
ती काय राहणार? आणखी दागिने ते कुठले होणार? त्यांतून जानकीबा
थोडीशी उधळी असे. स्वतः काम करणें तिच्या फार जिवावर येई. ज
जास्ती काम पडलें, कीं तिच्या अंगाचा संताप होई. एक दिवस मोलकरी
आली नाहीं, कीं हिनें संतापावें. जेमतेम स्वयंपाक करावाच लागे. त्याल
इलाज नाहीं; पण होतां होईल तों मोलानें काम द्यावें आणि आपण का
न करतां स्वस्थ बसावें, ही मोठी इच्छा.

अशा स्वभावाच्या बायकोच्या हातीं तीस रुपयांनी होणार काय
तरी रामभाऊ तिची अगदीं मर्जी धरून असे. बायको म्हणेल काय, आणि
मी तें करीन केव्हा, असे नेहमीं त्याला झालेलें असें. ज्या गोष्टी थोड्या
थोडक्यांत त्याच्या हातून होतील, त्या सर्व करून, तो तिची मनधरणी
करीत असे; परंतु स्वभावाला औषध नाहीं. जानकीबाई आपली स्थिती
जाणून नसे. आपल्या नवऱ्याला सारे तीस रुपये मिळतात. तेवढ्यांत
आपला गुजारा करून संतोषानें असावें असें तिला न वाटतां, उलट ती
नेहमीं असंतुष्ट असे. आपल्याला काम करावें लागतें, मोठी लुगडीं व
चोळ्या मिळत नाहींत, दागदागिने मुळींच नाहींत, नेहमीं दरिद्र्याप्रमाणे
राबावें लागतें, याबद्दल तिला अत्यंत वाईट वाटे आणि ती मनात फार
चडफडत असे. जेव्हां तेव्हां तिनें त्रासावें व आदळआपट करावी अशी
स्थिती होती.

तरी रामभाऊनें तिचा कधीही अव्हेर केला नाहीं.

रामभाऊचं लग्न लहानपणींच झालं. पुढे त्याला चाकरी लागते, न
लागतें तो त्याचा बाप वारला. बापाच्या पाठीमागे काय ! चारपांचशे रुपये
शिल्लक असतील नसतील; पण थोडेबहुत कर्जही होते. तेव्हां देणें-घेणें
बरोबरच झाले. इकडे बायको अशा तऱ्हेची! त्यामुळें त्याला फार खेद
होई. उघडच आहे ! नवराबायको दोघे अगदी एकजुटीनें व एकमनानें
नाहींत, तेथे संसार कसला? बोजवाराच म्हणावयाचा.

मार्गशीर्षाचा महिना होता. गावांत मुंजीलग्नांची गर्दी उडाली होती. एके
दिवशी संध्याकाळीं रामभाऊ कचेरींतून घरी आला व मोठ्या आनंदानें

आपल्या बायकोस म्हणतो, "उद्या सकाळी आमच्या वरिष्ठांची बायको येणार आहे तुला बोलवायला. त्यांच्या येथें त्यांच्या मुलाची मुंज आहे, अक्षत निघणार आहे, तेव्हां तुला गेलं पाहिजे."

"मी नाही जाणार. ह्या असल्या चिंध्या नेसून आपली लंकेची पार्वती चालली म्हणे अक्षतीला न् मुंजीला !"

"कां बरं ? तुझी ती चंद्रकळा नाहीं, कधींमधीं नेसायची?"

"अहाहा, काय पण तो चंद्रकळेचा बोळा ! कांही बोलायला वाटतय् की नाही ! कधी काळी एक सुडकं घेऊन ठेवलं आहे. त्या तीनतीनदा काढायचे!"

"चवदा रुपयांची बेळगांवी चंद्रकळा आणवली, आणखी तें देखील सुडकंच झाले का तुला ?" रामभाऊ शांतपणे म्हणाला.

हे बोलणे ऐकून तर जानकीबाई जास्तच चिडल्यासारखी झाली. ती नवऱ्याला वेडावून दाखवीत म्हणते, "चवदा रुपयांची बेळगांवी चंद्रकळा आणवली ! मोठें हेच केले असेल ? अगदी चवदा रुपये गाऊन काय उपयोगी ? त्याला वर्से किती झाली? काही आहे का ध्यानांत? तो बोळा घेतल्याला आज म्हटलं पांच वर्सं झाली. आणखी तो तरी घेतला म्हणजे काय? कांही त्याच्यावर कशिदा आहे, का खडी आहे, का आणखी कांही आहे? अन् ती घ्यायला किती दिवस पाठ पुरवली होती? ते कांही नाही. मी कांही उद्या त्यांच्या घरी जायची नाही अन् त्या सकाळी बोलवायला घरी येणार असल्या तर मी आपली घटकाभर बाहेर जाईन."

रामभाऊ मुकाट्यानें ऐकून घेत होता. काय करणार? आपल्या बायकोच्या इच्छा तृप्त करण्याला आपल्याजवळ साधन नाही, याबद्दल त्याला आधींच किती तरी वाईट वाटे आणि त्यांत प्रसंगानुसार अशी कांही बोलणी बायकोच्या तोंडून निघाली, म्हणजे तर त्याचे मन फारच उद्विग्न होत असे. आज तो कचेरीतून आला तो अंमळ आनंदातच आला. कारण त्याच्या वरिष्ठाने त्याला 'आपली बायको उद्यां तुमच्या कुटुंबाला बोलवायाला येणार आहे, तुम्ही दोघेही दोन दिवस आमच्याच इथें राहायला या,' असे सांगून पांच रुपयांची बढती झाल्याचीही बातमी सांगितली होती. ती बातमी बायकोला सांगावी, आपल्याप्रमाणेंच तिलाही आनंद होईल. तो

म्हणतो,"

"आणखी पंधरा वीस रुपये कोणाचे तरी आणायचे, आणखी घ्या
एकदा चाळिसाची पोफळी."

दुसऱ्याचे पैसे काढून आणायचे म्हटल्याबरोबर रामभाऊस कसें
झाले. आजपर्यंत त्याने कर्ज म्हणून केलें नव्हते. करतो कसचें विचा
तरीपण बायकोचें म्हणणे मोडण्यापेक्षा स्वतःचे मन मोडणें त्याला ज
सुलभ वाटले. त्यानें तिच्या म्हणण्याला रुकार दिला. दुसरे दिवशी सकाळ
एका स्नेह्यापासून कांही रुपये उसने आणले, आणि पांच-चार रं
पोफळ्या आणून बायकोला दाखविल्या. तिनें एक पसंत केली.
घेतलीहि; संध्याकाळी अक्षतीला जाण्याची वेळ झाली. तोंपर्यंत
पोफळीमुळे झालेल्या आनंदानेंच काय ती जणू काय आपल्याला ब
जाण्याला आणखी ज्या कांहीं अडचणी होत्या, निदान तिला वा
होत्या, त्या सर्व विसरून गेली होती असे दिसलें, ते दिवशी
पोफळीची घडी मोडली नाहींच.

दुसरे दिवशी मुंजीच्या मुहूर्तावर मोडून मातृभोजनाला बसण्य
तिचा विचार होता. तिनें आपली पूर्वीची चंद्रकळाच काढली आणि
नेसू लागली. आपली बायको आज आनंदात आहे हे पाहून रामभाऊ
आज फार आनंदात होता; पण तितक्यांत जानकीबाई मोठ्यानें म्हण
'अन् आता नाकात चांगली नथ नाही, त्याचं कसं करायचं! ही पोफ
घेतली, त्याच्यापेक्षा आणखी एक शंभर दोनशे रुपये काढून नथच के
असती तर ! झाली पोफळी म्हणजे झालं का ! नाक बुच्चं आणखी....

"पण आतां काय त्याचं? म्हटल्या वेळी का नथ येत असते? आ
पोफळी झाली. उद्यां... अन् लोकांना ठाऊक आहे आपण गरीब आहों
हे."

"कस्सा जरी गरीब असला तरी बायकोला नथ धड नाही असं कां
कधी होत नाही; पण आपली एक तऱ्हाच निराळी ! आतां आजच्यापुर
मी येतें आपल्या सुंदराबाईची नथ घेऊन; पण आधी आता नथ करा
दोनशांची का होईना, पण स्वतःची नथ पाहिजे बाई. संक्रांतीला जर म
नथ मिळाली नाहीं, तर... पण आतांच कशाला काय बोलूं काय ते

कांही नाही. आपण जमवूं जमवूं म्हणून कांही जमत नाही. थोडंसे अधिक व्याज पडले, तरी द्यायचं कबूल करावं. आणखी दोन-अडीचशें रुपये कोणापासून काढून नथ करावी. म्हणजे कर्ज फेडण्याची आंच लागून आपण हप्त्या-हप्त्याने रुपये फेडून नथ पदरांत पडेल."

"भलतेंच एखादं, आपल्याला पैसे देतो कोण? आपण आपली अशीच करूं सोईनें," रामभाऊ शांतपणे म्हणाला.

"सोईसोईने, झाली! कांही व्हायचं नाही न् जायचं नाही. आपल्याला मिळत नाही रुपये तर मी आणते. शेकडा दोन रुपये व्याज कबूल केलं, म्हणजे आतां कोण हवा तो देईल. बरं, पण तो वाद आतां कशाला? आत्तापुरती सुंदराबाईची मागून आणून वेळ तर मारून नेऊ."

"छे! छे! छे! दुसऱ्याचे जोखीम नको आणू उगीच." रामभाऊ झटकन् म्हणाला.

"जोखीम कसली आहे त्यांत? घटकाभर घालण्यासाठी आणायची. त्यात ती मेली एवढी जोखीम कसली आली आहे?" जानकीबाईनें नाक मुरडून उत्तर दिले.

"ते खरं गं, पण उगीच गेली-आली, पंचाईत कशाला?"

"हेंच ते? एवढी थोरली चंद्रकळा नेसायची, अक्षतीला जायचं अन् नाकात सुंकलं! बरं दिसेल का हें?"

जानकीबाई थोडी खुशीत येऊनच बोलत होती. प्रथमतः जी चंद्रकळा 'दांडकं,' 'बोळा' वगैरे विशेषणांना योग्य होती, ती आतां एवढी 'थोरली' झाली..

रामभाऊ आणखी 'नको'; 'नको 'म्हणणार होता; परंतु जानकीबाई केंव्हांच गेली. पटकन् जाऊन त्यांच्याशेजारी एक मुन्सफ राहत असत, त्यांच्या बायकोची नथ मागून आणली. सुंदरबाईनें आपली नथ देण्याला थोडेंसे कांकूंच केले; परंतु एवढी बाई नथ मागायला आल्यावर 'साफ नाही' तरी कसें म्हणावे? सुंदराबाई थोडीशी भिडस्त होती, तरी कपाळाला आठ्या वगैरे घालून 'आतां माझी किल्लीच कुठे असेल.' आतां ती पेंटीत खोल असेल, वगैरे बोलून अप्रत्यक्ष रीतीने नथ देण्याविषयी तिनें आपली नाखुषी दाखविलीच; पण नथेसाठी उल्हासलेल्या जानकीबाईस त्या आंठ्याहि

कांही नाही. आपण जमवूं जमवूं म्हणून कांही जमत नाही. थोडंसे अधिक व्याज पडले, तरी द्यायचं कबूल करावं. आणखी दोन-अडीचशें रुपये कोणापासून काढून नथ करावी. म्हणजे कर्ज फेडण्याची आंच लागून आपण हप्त्या-हप्त्याने रुपये फेडून नथ पदरांत पडेल.''

''भलतेंच एखादं, आपल्याला पैसे देतो कोण? आपण आपली अशीच करूं सोईनें,'' रामभाऊ शांतपणे म्हणाला.

''सोईसोईने, झाली! कांही व्हायचं नाही न् जायचं नाही. आपल्याला मिळत नाही रुपये तर मी आणते. शेकडा दोन रुपये व्याज कबूल केलं, म्हणजे आतां कोण हवा तो देईल. बरं, पण तो वाद आतां कशाला? आत्तापुरती सुंदराबाईची मागून आणून वेळ तर मारून नेऊ.''

''छे! छे! छे! दुसऱ्याचे जोखीम नको आणू उगीच.'' रामभाऊ झटकन् म्हणाला.

''जोखीम कसली आहे त्यांत? घटकाभर घालण्यासाठी आणायची. त्यात ती मेली एवढी जोखीम कसली आली आहे?'' जानकीबाईनें नाक मुरडून उत्तर दिले.

''ते खरं गं, पण उगीच गेली-आली, पंचाईत कशाला?''

''हेंच ते? एवढी थोरली चंद्रकळा नेसायची, अक्षतीला जायचं अन् नाकात सुंकलं! बरं दिसेल का हें?''

जानकीबाई थोडी खुशीत येऊनच बोलत होती. प्रथमतः जी चंद्रकळा 'दांडकं,' 'बोळा' वगैरे विशेषणांना योग्य होती, ती आतां एवढी 'थोरली' झाली..

रामभाऊ आणखी 'नको'; 'नको 'म्हणणार होता; परंतु जानकीबाई केंव्हांच गेली. पटकन् जाऊन त्यांच्याशेजारी एक मुन्सफ राहत असत, त्यांच्या बायकोंची नथ मागून आणली. सुंदरबाईनें आपली नथ देण्याला थोडेंसे कांकूंच केले; परंतु एवढी बाई नथ मागायला आल्यावर 'साफ नाही' तरी कसें म्हणावे? सुंदराबाई थोडीशी भिडस्त होती, तरी कपाळाला आठ्या वगैरे घालून 'आतां माझी किल्लीच कुठे असेल.' आतां ती पेंटीत खोल असेल, वगैरे बोलून अप्रत्यक्ष रीतीने नथ देण्याविषयी तिनें आपली नाखुषी दाखविलीच; पण नथेसाठी उल्हासलेल्या जानकीबाईस त्या आंठ्याहि

दिसल्या नाहींत आणि त्या किल्लीच्या वगैरे सबबींचा अर्थहि समजला नाही. 'उलट मी लागतें तुम्हांला किल्ली शोधायला, इथेंच असेल कुठे तरी? नथ ती नेहमी लागायची, ती मेली अशी किती खोल असायची आहे?' वगैरे बोलून तिने त्या बाईला नथ काढून देण्याला लावलेंच. तिकडे उशीर होत होता म्हणून रामभाऊ उतावळी करीतच होता. नथ काढीत असतांना तिथेंच दोरीवर असलेली शालजोडी जानकीबाईच्या नजरेस पडली. त्याबरोबर तिने ती उचलून 'शालजोडीदेखील घेऊन जातें बरं का?' असे म्हणून अंगावर घेतलीच. नाक मुरडून; पण "बरं आहे, न्या; पण नीट जपा हां दोन्ही जिनसांना." एवढेच म्हणाली. याहून आणखी काय म्हणणार?

जानकीबाई मारे त्या शालजोडीचा फलकावा मारून नथेच्या झोकांत बाहर आली. ती दिसण्याला थोडीशी नीटस असल्यामुळे त्या शालजोडीनें व नथेने विशेषच चांगली दिसूं लागली. "अजूनपर्यंत काय करते आहे बोआ ही?" असे आपल्याशींच त्रासून म्हणणार व "कशाला ही गेली उगीच लोकांच्या जिनसा मागायला" असें वाटून त्रासलेला रामभाऊदेखील तिला त्या झोकांत पाहण्याबरोबर थोडासा खूष झाला व आतांपर्यंतचा त्रास त्याच्या मनांतून जाऊन आपण स्वतः आपल्या बायकोला अशा जिनसा केंव्हा बरें करूं असे त्याला वाटून, क्षणमात्र तो खिन्न झाला.

तें जोडपे अक्षतीला गेलें. जी ती बाई - आणि जो तो गृहस्थ म्हटलें तरिदेखील चालेल, आपल्याकडे पाहून "ही कोण ? कोणाची? अशा तऱ्हेची चौकशी करताहेत," असें जानकीबाईस वाटलें. त्यामुळे ती किती तरी आनंदली! त्यांतून घरच्या यजमानणींने मुंज्या मुलाच्या आईनें - जेंव्हा, 'वा जानकीबाई, किती तरी... पण तुम्हांला ही नथ न् शालजोडी शोभते,' असें म्हटलें, तेंव्हा तर जानकीबाईला मूठभर मांस आलेंसे दिसलें. मग ती यजमानीण शालजोडीचें व नथेचें इंगित जाणून एक तसें म्हणाली की सहज म्हणाली, या गोष्टीचा विचार जानकीबाईच्या अंतःकरणाला क्षणभरदेखील शिवलासा दिसला नाही. "उद्या मातृभोजनाला मी पोफळी नेसून आलें म्हणजे काय म्हणतील ह्या ?" अशा सुखकर विचारांत बिचारी गर्क होऊन गेली होती.

अक्षतीच्या समारंभाबरोबर गणपति-जोगेश्वरीला जाऊन यजमानणी विचारून ती घरी यायला निघाली, तेंव्हा यजमानणीने तिला पुनःपु मातृभोजनाला येण्याविषयी आग्रह केला. अर्थातच पुनः तिला आपल पोफळीची आठवण होऊन, ती नेसल्यावर आपण सकाळी याच्याहीपे किती झोंकदार दिसूं... याच विचारांत आपल्या नवऱ्याबरोबर ती घरी प आली.

बायकोला आज अतिशय आनंदांत पाहून रामभाऊला जो आन झाला, तो कांही विचारूच नका. त्याला असे वाटले, की आपल बायकोला नेहमी अशा आनंदाच्या स्थितीत ठेवण्याची गुरूकिल्लीच आपल हाती सांपडली. एक बेताची सुमारें दोनशे-अडीचशे रुपयांची नथ चांगली शालजोडी अशा जिनसा घेऊन दिल्या, की झालें. दोनहि जिन घेण्यास सुमारे तीनशें-साडेतीनशें रुपये जमले म्हणजे झालं आणि आप दुसरें कांही घरी करायचें काम पतकरून - कांही तरी करून - प वर्षभराच्या आंत या दोनहि जिनसा घेऊंच घेऊ, अशी त्यानें उमे बांधली. बायकोला एकदम अचानक त्या जिनसा दाखवून आश्चर्यचकि करून सोडायची असें त्याला वाटल्यामुळें त्यांने तो आपला बेत तिल त्यावेळी सांगितला नाही. तितक्यांत त्याला बायकोनें आणलेल्या त्य जिनसांची आठवण होऊन, "त्या जिनसा आधी पोंचत्या करायच्या होत्या." असें म्हटलें. त्याबरोबर "करीन आतां उद्यां सकाळी मातृभोजनाला जाय आहे. तेंव्हा नथ घालायला पाहिजे. तेथून आले म्हणजे मग शालजोडी नथ दोन्ही बरोबरच पोंचवीन" असं जानकीबाईनं उत्तर दिलं. त्याव "नको ते विष, उगीच घरांत कशाला?" असें रामभाऊ पुटपुटला, "प त्याला काय झालं आहे? कांही रातोरात दरोडा पडतो आहे की काय? चांगली मी डबींत घालून डबी पेटीत घालून ठेवली आहे. शालजोडी तिथे दोरीवर ठेवली आहे." असें बोलून तिनें त्यांचे समाधान केले. रात्र मोठ आनंदांत गेली. मला वाटतें जानकीबाईला काय थोडीबहुत झोप लागल असेल, तींत पोफळी, नथ, मातृभोजन इत्यादी गोष्टी दिसल्या असतील कसलेहि काम असलें तरी जानकीबाई इतक्या पहांटे कधीं उठायची नाही पण आज अगदी लवकर उठून, अंग धुऊन, पोफळी नेसून, नथ चढवून

नाही !

मग काय विचारतां? एकच गोंधळ उडाला. घाबरून जाऊन जानकीबाईनें त्रिखंड शोधले. सतरा वेळां तिनं आपले ओचे झाडले. दुसऱ्या की तिसऱ्या खेपेस दूर कांही तरी पडलेंसे वाटले म्हणून तिनें सारी जागा शोधली; पण तें काय आणखी कुठे पडलें, त्याचा काही पत्ता लागेना. धांवत धांवत मुंजघरी गेली. तिथेहे तिनं त्रिखंड शोधलें. नथ गेली कशी ते सांगावे लागलें. सांगितल्यावर कित्येक म्हाताऱ्या बायकांच्या तोंडचे "तेच ते ! आहो, या आतांच्या काळच्या मुली नाजुक हो. अंमळ नथ घातली नाही तर याची नाकं ओघळायला लागतात!"

"आहो, हे चोचल! हा असला गळ्यांत नाही तर कानांत नथा घालण्याचा आचरटपणा आपल्याला ठाऊक तरी होता का?" असले उदगार; कित्येक बरोबरीच्या बायकांचे "आगं बाई, पण अशा कशा विसरलात जेवतां क्षणींच नाकांत अडकावयाला?," "अशी कशी पण गेली ती नथ?" असले प्रश्न, सर्व कांही सोसून घ्यावें लागलें. तितक्यांत एका स्पष्टवक्त्या बाईनं (मग तिला कसें कळले असेल तें असो !) "आणखी ती नथ सुंदराबाईची मागून आणलेली ना?" असा स्पष्ट प्रश्न केला. तेंव्हा तर सगळ्या गोष्टीचा कळस होऊन ती बिचारी रडूं लागली; पण तितक्यांत आणखी एक म्हातारी "हा एवढा सोस हो हा! संभाळायचें शहाणपण नाही तर लोकांची जिन्नस तरी आणू नये,' असें पुटपुटली. तें तिनें ऐकल्यावर तर तिला आतां मी एथून केंव्हा घरी जाईन असें झाले. जितकें शोधायचें तितकें तिनें शोधले; पण नथ न सापडता बिचारी परत आली. घरी येऊन पुनः एकदां तिनें आपले ओचे झाडले, पण नथ कुठे आहे? पोफळी सोडली, नीट झाडली, नथ मुळीच नाही. पुनः सारें घर शोधलें. दोघां नवराबायकोनीं मुंज-घरापासून आपल्या घरापर्यंत सर्व रस्ता बारीक नजरेने शोधला; पण नथेचा मुळीच ठिकाणा नाही. उलट ठिकठिकाणी लोक जमा होत, तो एक तमाशाच झाला.

ठरलें, नथ गेली. आता हे सुंदराबाईला सांगावे कसें! आणखी पुढें तजवीज काय करावी? तिची नथ अलबत तर सुमारे तीनशे-साडेतीनशांची, ती भरून द्यायची कशी? नथ हरवल्याची बातमी सुंदराबाईला लागतांच

नाही !

मग काय विचारतां? एकच गोंधळ उडाला. घाबरून जाऊन जानकीनं

त्रिखंड शोधले. सतरा वेळां तिनं आपले ओचे झाडले. दुसऱ्या

तिसऱ्या खेपेस दूर कांही तरी पडलेंसे वाटले म्हणून तिनें सारी ज

शोधली; पण तें काय आणखी कुठे पडलें, त्याचा काही पत्ता लाग

धांवत धांवत मुंजघरी गेली. तिथेहे तिनं त्रिखंड शोधलें. नथ गेली का

ते सांगावे लागलें. सांगितल्यावर कित्येक म्हाताऱ्या बायकांच्या तोंड

"तेच ते ! आहो, या आतांच्या काळच्या मुली नाजुक हो. अंमळ न

घातली नाही तर याची नाकं ओघळायला लागतात!"

"आहो, हे चोचल! हा असला गळ्यांत नाही तर कानांत न

घालण्याचा आचरटपणा आपल्याला ठाऊक तरी होता का?" अस

उदगार; कित्येक बरोबरीच्या बायकांचे "आगं बाई, पण अशा क

विसरलात जेवतां क्षणींच नाकांत अडकावयाला?," "अशी कशी प

गेली ती नथ?" असले प्रश्न, सर्व कांही सोसून घ्यावें लागलें. तितक्यां

एका स्पष्टवक्त्या बाईनं (मग तिला कसें कळले असेल तें असो !

"आणखी ती नथ सुंदराबाईची मागून आणलेली ना?" असा स्प

प्रश्न केला. तेंव्हा तर सगळ्या गोष्टीचा कळस होऊन ती बिचारी र

लागली; पण तितक्यांत आणखी एक म्हातारी "हा एवढा सोस हो ह

संभाळायचें शहाणपण नाही तर लोकांची जिन्नस तरी आणू नये,' अ

पुटपुटली. तें तिनें ऐकल्यावर तर तिला आतां मी एथून केंव्हा घरी जाईन

असें झाले. जितकें शोधायचें तितकें तिनें शोधलें; पण नथ न सापडत

बिचारी परत आली. घरी येऊन पुनः एकदां तिनें आपले ओचे झाडले,

पण नथ कुठे आहे? पोफळी सोडली, नीट झाडली, नथ मुळीच नाही

पुनः सारें घर शोधलें. दोघां नवराबायकोनीं मुंज-घरापासून आपल्या

घरापर्यंत सर्व रस्ता बारीक नजरेने शोधला; पण नथेचा मुळीच ठिकाण

नाही. उलट ठिकठिकाणी लोक जमा होत, तो एक तमाशाच झाला.

ठरलें, नथ गेली. आता हे सुंदराबाईला सांगावे कसें! आणखी पु

तजवीज काय करावी? तिची नथ अलबत तर सुमारे तीनशे-साडेतीनशांची

ती भरून द्यायची कशी? नथ हरवल्याची बातमी सुंदराबाईला लागतांच

ती येऊन "मला वाटलंच होतं, तेवढ्याकरिता तर मी मागे-मागे घेत होते; पण तुमचा अगदी आग्रह दिसला, म्हणून भीड तुटेना. आपल्याला जर अशी सांभाळण्याची ही नाही, तर कशाला बरं न्यावी? अस्सं कायसंसं करतात बायका! नाही घातले दागिने तर होतं काय ? पण नाही, डौल पाहिजे.' असें हजार गाडे बोलली असेल.' "आम्ही भरून देऊं हो" एवढे शब्द जेमतेम उच्चारून अगदी हिरमुसलें तोंड करून जानकीबाई परत घरी आली व एकसारखी रडत बसली.

"आम्ही भरून देऊं हो!" हें बोलायला ठीक; पण हातून व्हावे कसें? रामभाऊनें पाहिलं, की आतां आपण जर आपल्या बायकोला धीर दिला नाही, तर फार वाईट स्थिती होईल. त्याने तिला घट्ट पोटाशी धरलें व 'कांही हरकत नाही. आता गेली त्याला काय करायचं? पुढची तजवीज पाहिली पाहिजे. केवढ्याची त्यांची नथ विचारलंस का?' असें म्हटलें, परंतु जानकीबाईंचें रडें कोठले थांबायला? आपल्या उधळेपणाचा, आपल्या सोसाचा, आपल्या असंतोषीपणाचा, सर्व कांही गोष्टींचा खरा-खरा परिणाम काय तो आज तिच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत दिसू लागला. आपण अमुक केले नसतें, तर हा प्रसंग आपल्यावर आला नसता आणि यदाकदाचित आला असता, तरी आपण अशी उधळमाधळ केली नसती, रिकाम्या डौलाखाली गेलो नसतो तर आज या प्रसंगातून थोडेबहुत तरी पार पडलों असतों असें पुनः तिला पक्कें वाटलें. आपल्या स्वतःला व आपल्या नवऱ्याला आजपर्यंत विनाकारण दुःख देऊन आज तर आपण त्याचा कळस केला असेंहि तिला वाटलें. ती फारच शोक करूं लागली. शेवटी 'आता तू उगी राहा. आला प्रसंग त्याला करायचं काय? करू कांही तरी?' असें म्हणून त्यानं तिचें समाधान करण्याची खटपट केली; परंतु ते दिवशी तर तिचें समाधान झालेच नाही. ती सारा दिवस रडतच होती.

पुढें दोनतीन दिवसांत सुंदराबाईकडून नथेबद्दल तगादे आले, तेंव्हा आपण होऊन शेवटी रामभाऊजवळ गोष्ट काढली. रामभाऊनें आपल्या पांचसहा ओळखीच्या गृहस्थांकडून काही व्याजी, कांही तसेच मिळून सुमारे साडेतीनशे रुपये काढण्याची तजवीज चालविलीच होती; परंतु प्रसंगी कोण उपयोगी पडतो ? शेवटी त्याने रुपया मितीनेंदेखील मिळाल्यास

रक्कम काढली पाहिजे असें पाहून त्याप्रमाणे तजवीज केली. कोणा भिडेभाडेनें एक गृहस्थ त्या गोष्टीला कबूल होऊन त्यांनें रामभाऊ तीनशे रुपये दिले. जानकीबाईला ही हकिकत कळतांच किती वाईट वाटलें? पण काय करते बिचारी !!! आपल्या अंगावर काय किडूकमिडूक होतें, 'तेहि मोडा' म्हणून नवऱ्याच्या पाठीस लागून त्याचे काय पांचपन्नास रुपेय आले, ते त्याच्या भरतीला घातले. पुरणाच्या पाटल्या मोडण्यास व ती पोफळीदेखील विकून टाकण्यासाठी ती पाठीस लागली. पण रामभाऊने ते अगदी कबूल केलें नाही. त्याला वाटलें, की तिला समाधानाला तेवढी तरी राहूंच द्यावी. अनेक मार्गांनी रुपये जमवून ती नथ तर भरू दिलीच!

...परंतु ते दिवसापासून जानकीबाई किती काटकसरीनें राहू लागली. मोलकरणीला रजा दिली, अनाठायी खर्च म्हटला, की तो अगदी न होऊ देण्याविषयी ती किती जपू लागली! रामभाऊ दुसऱ्या कोणाचे काम घरं आणून रात्री-अपरात्री लिहून कांही पैसे मिळवू लागला; परंतु ते पाहून जानकीबाईला किती अपरंपार दु:ख होई! ती हरतऱ्हा करून आतां पैसा पैसा गांठी बांधू लागली; कर्ज म्हणजे एक मोठाच बाऊ तिला वाटू लागला. ती पोफळी तर तिनं आतां कधी दृष्टीसमोरदेखील येऊ दिली नाही. 'कर्ज' फिटून मोकळी होईपर्यंत त्या मेलीचं मला दर्शनसुद्धा नकं असें ती नेहमी म्हणे. कर्जाच्या काळजीनं ती बिचारी अगदीच वाळली. ज्या जानकीबाईला तीस रुपये संसाराला पुरतना, ती आतां बाराचौदा रुपयांत दुमदुमीत संसार करू लागली; आणि उरलेले पगारातले वीस आणखी नवऱ्याला अवांतर कांही आठदहा मिळत, ते मिळून कर्जाची फेड करण्यासाठी एकसारखा त्या दोघांचा यत्न चालला होता. पैसा म्हणजे काय आणि दागिने कसे होतात ही गोष्ट आतां जानकीबाईला किती चांगल्या तऱ्हेने कळून आली! आतां ती दागिन्याचें नावंसुद्धा काढीनाशी झाली.

होतां होतां दहा महिने झाले. या महिन्यांत जानकीबाईने काटकसरीची कमाल करून, रिकामा डौल अगदी दूर झुगारून आणि रामभाऊनें सटरफटर कामे करून, अधिक पैसे मिळवून दर महिन्याच्या महिन्यास आपला हप्ता

चुकविला. हप्त्याची तारीख कधीही चुकू दिली नाही. अर्थातच दर महिन्यास व्याज कमी कमी होत जाऊन कर्ज देणाऱ्या स्नेह्यास अणुमात्र तक्रार करण्यास जागा राहिली नाही. संक्रांतीचा दिवस येऊन ठेपला. अदला दिवसच शेवटचा हप्ता भरण्याचा होता, तो रामभाऊनें सावकारास नेऊन दिला, तेंव्हा त्या दिवशी रात्रीं त्या दोघां नवराबायकोंचें त्या कर्जासंबंधाने बरेंच बोलणें झालें.

"उद्या संक्रांत आहे, आतां तू ती पोफळी नेसच, काय होईल ते होवो. आतां कांही कर्ज उरलं नाही. मग कां असं?" असें रामभाऊ म्हणत होता. जानकीबाई नाही-नाही म्हणत होती. तिच्या मनांत गेल्या दहा महिन्यांतील सर्व स्थिती उभी राहिली होती. "गेल्या संक्रांतीलाच नथ करण्यासाठी आपण आपल्या नवऱ्याच्या पाठीस लागलो होतो, कर्ज काढण्याची भर देत होतों, ती नथ तर त्यावेळी मिळाली नाहींच; परंतु कर्ज काढून तें मात्र मरेमरेतो काम करून आणि पोटाला पुरते न खाऊन फेडावें लागले. हीच जर मी सोसानें दुसऱ्याची नथ आणली नसती आणि असे काटकसरीनें राहून रुपये जमवले असते, तर आजला केवढी थोरली नथ अगदी स्वतःची झाली असती," असे पश्चात्तापाचे विचार मनांत येऊन ती अतोनात खिन्न झाली. तिनें एक दीर्घ सुस्कारा टाकला. रामभाऊस तो ऐकू आला आणि आपल्या प्रिय पत्नीच्या मनांत काय विचार असावेत हें त्यानें ताडलें.

"झाली गोष्ट ती झाली, आतां तिच्याबद्दल विषाद काय म्हणून करावा? तसे झाले म्हणून तर आपण इतकें शहाणपण शिकलों, मला यंदा आणखी पांचांची बढती झाली आहे. अशा बेताबेताने राहिलों, तर पुढच्या संक्रांतीला नथ. नथ- नथ ती काय मोठीशी !' असें बोलून त्यानें तिच्याकडे सप्रेम दृष्टीनें पाहिलें. तिच्या त्या खिन्न झालेल्या चेहऱ्यावर एकदम स्मित दिसूं लागलें. नव्हें ती खुदकन हसलीहि. त्या नवऱ्याच्या उत्तेजक शब्दांनी व सप्रेम दृष्टीनें तिला नथच काय; परंतु सगळे दागिने मिळाल्याप्रमाणे झाले. "पण माझ्या नादिष्टपणानं इकडे कितीतरी त्रास झाला, आतां मी कधीसुद्धा असा नादिष्टपणा करायची नाही," असें तिनें अंतःकरणपूर्वक म्हणून त्याच्याकडे फार प्रेमानें पाहिलें.

इतक्यात काय चमत्कार झाला पाहा ! मांजराने उडी टाकावी तशी कोणी पटकन् उडी टाकल्याचा आवाज ऐकू आल्यामुळें जानकीबाई घाबरून उठली व तिनें दिवा लावला, तों खरोखरीच एक मांजर कोपऱ्यांत खडबड करीत आहे. तिनें दिवा घेऊन त्याला शुक् शुक् केले; पण ते तिथे एकसारखें ओरबाडीतच राहिलें. मग काय कोणास कळे ! जानकीबाई काठी घेऊन त्याला हांकताना 'ही मेंली बिळं उद्यां बुजवून टाकलीं पाहिजेत,' असें म्हणाली. पुन: तिच्या मनांत काय आलें ते असो. ती लागलीच म्हणते,' उद्यांपर्यंत तरी वाट पाहण्यांत काय अर्थ आहे? न जाणो उंदीरच आहे का आणखी कांही आहे ? आत्तांच घालतें त्यांत चार रोडे' असे म्हणत रोडे आणायला जाऊं लागली.

रामभाऊने 'आत्तां कशाला? उद्या कां होईनां;' असं म्हटले; पण तिनें ऐकले नाही. आपला लामणदिवा घेऊन रोडे आणून ती बिळापाशीं गेलीच; पण काय? जो रोडा आत ठेचावा, तो आंतच जाई आणि बीळ मोठे होई. दोनतीन रोडे घातले, तरी ते गडप झाले आणि बिळाचे तोंड मात्र मोठे झाले. त्यामुळे थोडे आंत दिसू लागलें आणि त्यांत कांही चमकतें आहे असें तिला वाटले. त्यासरशी ती "अगंबाई ! हे काय इथें आहे?" असे मोठ्यांनी ओरडली. तिला वाटलें; की सापाबिपाचा डोळाबिळा असावा. रामभाऊहि तिच्या जवळ जाऊन पाहतो, तो खरेंच बिळांत कांही चमकत आहे. हलके हलके भीत भीत वांकून पाहतो व जरा धैर्य करून काटूक घालून पाहतो; तों तें काय होते, ते अलीकडे आलें. त्यांने ते आणखी अलीकडे ओढलें व पाहतो तो एकदम 'न थ' ही अक्षरें त्यांच्या तोंडून बाहेर पडली.

होय. सुमारे वर्षापूर्वी जी सुंदराबाईची नथ जानकीबाईने हरवली होती, तीच ती नथ होती. नथ गळ्यांतून तिच्या ओंच्यांत पडली होती, ती तिनें आपले ओंचे दोनतीनंदा झाडले, तेंव्हाच उडून दूर कोपऱ्यांत बिळाच्या आंत पडली. त्रिखंड शोधले, तरी सांपडली नाही. त्यावर किती वेळां सारवितांना जानकीबाईचा हात त्या बिळापाशी गेला असेल, पण ती कधी तिच्या नजरेस आली नाही; परंतु आज अशी आणि ती अचानक सांपडली. त्याबद्दल त्यांना किती चमत्कार वाटला असेल? आणि ती

पाहण्याबरोबर त्या दोघांस किती आनंद झाला असेल? जानकीबाई तर अतिहर्षानें अश्रूच ढाळू लागली. जिकडेतिकडे आनंदी आनंद झाला. जानकीबाईच्या वर्षभराच्या श्रमांचे, काटकसरींचे वगैरेचें त्यांस बक्षीसच मिळालें म्हणायचें. त्या नथीची खरी किंमत जानकीबाईस फारच चांगल्या तऱ्हेने कळली.

दुसरे दिवशी जानकीबाई मोठ्या आनंदाने आपली पोफळी नेसून व ती नथ घालून जोगेश्वरीला गेली; अचानक नथ सांपडल्याबद्दल अतोनात आनंद होऊन फार उधळमाधळ न करितां; पण हळदीकुंकवाचा थोडासा थाट करून तिने ऊस लुटवले; त्याचप्रमाणे तिला अत्यानंदांत पाहून रामभाऊचा आनंद दुणावला हे आता काय सांगावयास पाहजे?

❄ ❄ ❄